0 8 FEB 2026

पुढारी

# जीवनात यशस्वी होण्यासाठी पाच मूलभूत कौशल्ये आवश्यक : डॉ. गुरव

**कोल्हापूर** : जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीकडे किमान पाच मूलभूत कौशल्ये असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ माजी वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

शहाजी महाविद्यालय आयक्यूएसी व कॉमर्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॉमर्स फेस्टिव्हलअंतर्गत 'जीवन कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास' विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवान अध्यक्षस्थानी होते. कॉमर्स विभागप्रमुख प्रा. संतोष कांबळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी समन्वयक डॉ. राहुल मांडणीकर, डॉ. ए. बी. बलुगडे, डॉ. डी. के. वळवी यांची प्रमुख उपस्थिती होती.


08 FEB 2026
पुढारी

# कुलगुरूपदाच्या अर्जांची उद्यापासून छाननी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी राज्यभरातून ११५ अर्ज केले आहेत. यात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह ११५ जणांचा समावेश आहे. अर्जांची छाननी दि. ९ व १० फेब्रुवारीपर्यंत चालणार असून त्यानंतर पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर २०२५ रोजी पूर्ण झाला. त्यानंतर कुलगुरू निवड समितीने तीन सदस्यांपैकी एकाची निवड केली. सध्या पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे कुलगुरूपदाचा प्रभारी कार्यभार सोपवला आहे. कुलपती कार्यालयाने कुलगुरूपदासाठी २३ डिसेंबर ते २७



जानेवारी या कालावधीत अर्ज मागवले होते. शेवटच्या दिवसापर्यंत ११५ जणांनी या पदासाठी अर्ज भरले आहेत. सोमवार व मंगळवार दोन दिवस अर्जांची छाननीची प्रक्रिया चालणार आहे. त्यानंतर पात्र उमेदवारांची कच्ची यादी जाहीर होऊन त्यावर हरकती मागवल्या जातील. हरकतींचे निरसन करून अंतिम यादी जाहीर केली जाईल. त्यानंतर निवड समितीकडून मुलाखत प्रक्रिया पार पडेल. त्यातून पाच उमेदवारांची नावे अंतिम केली जातील. यामधून एकाची निवड होईल.